विधानमंडळ कामकाज प्राथम्य

विधानमंडळ अधिवेशन कालावधीत मंत्रालयीन विभागांच्या सचिवांनी सभागृहाच्या गॅलरीत उपस्थित राहण्याबाबत व अधिवेशनासंबंधीत कामकाज विहित कालमर्यादेत पूर्ण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

संसदीय कार्य विभाग

शासन परिपत्रक क्रमांक: विमंअ-०२२६/प्र.क्र. ७७/पाच,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०००३२.

दिनांक : १७ जून, २०२६

शासन परिपत्रक

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२६ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन, विधानभवन, मुंबई येथे सोमवार, दिनांक २२ जून, २०२६ पासून सुरू होत आहे. विधानमंडळाच्या अधिवेशनाचे कामकाज जबाबदारीने व सर्वप्राथम्याने हाताळणे आवश्यक आहे. विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात मा.विधानमंडळ सदस्यांकडून विविध संसदीय आयुधांच्या माध्यमातून अनेकविध विषयांवर चर्चा उपस्थित केली जाते. तसेच, पुरवणी मागण्यांवरील चर्चा व मतदान, विधानसभा नियम २९२ व २९३ अन्वये प्रस्ताव, विधानपरिषद नियम २५९ व २६० अन्वये प्रस्ताव आणि विधेयके इत्यादी महत्त्वाच्या कामकाजावर सभागृहात चर्चा होत असते. सभागृहातील चर्चेतील महत्त्वांच्या मुद्यांची नोंद घेऊन त्यावर संबंधीत मंत्री महोदयांच्या निर्देशांनुसार पुढील आवश्यक कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने खालील सूचनांचे अनुपालन करण्याची दक्षता घेण्यात यावी:-

१. उभय सभागृहातील चर्चेच्या वेळी संबंधित विभागाच्या सचिवांनी सभागृहातील सचिव गॅलरीमध्ये निश्चितपणे उपस्थित रहावे व अन्य सभागृहातील गॅलरीत निकटतम वरिष्ठ अधिकाऱ्यास उपस्थित ठेवावे.

२. मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांनी अधिवेशनाच्या कालावधीत मुख्यालयी निश्चितपणे उपस्थित रहावे. परंतु काही अपरिहार्य कारणांमुळे, त्यांना मुंबईबाहेर दौऱ्यावर जाणे भाग पडल्यास, त्यांनी माझी व त्यांच्या संबंधित मंत्र्यांची पूर्वानुमती घ्यावी व त्यांच्या अनुपस्थितीत विधानमंडळ अधिवेशनाचे कामकाज पार पाडण्यासाठी जबाबदार अधिकाऱ्याची नियुक्ती करावी.

३. विधानमंडळाच्या विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहात तारांकित/अतारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९३ अन्वयेच्या सूचना, स्थगन प्रस्ताव, औचित्याचे मुद्दे, विशेष उल्लेख इत्यादी संसदीय आयुधांच्या माध्यमातून उपस्थित करण्यात आलेल्या बाबींसंदर्भात शासनाकडून कार्यवाही करण्याचा कालावधी विधानसभा आणि विधानपरिषद नियमांद्वारे विहित करण्यात आलेला आहे. तथापि, विहित कालावधीत कार्यवाही न झाल्यामुळे, सन्माननीय सदस्यांकडून नापसंती व्यक्त करण्यात येते. तसेच, त्यासंदर्भात मा.पीठासीन अधिकारी वेळोवेळी बैठका घेऊन अथवा पत्राद्वारे शासनाला सबंधीतांविरुद्ध कडक कार्यवाही करण्याबाबत निदेश देतात. या पार्श्वभूमीवर सन्माननीय सदस्यांनी विविध संसदीय आयुधांद्वारे उपस्थित केलेल्या सर्व बाबी नियमांद्वारे विहित केलेल्या कालावधीतच निकाली काढण्याच्या तसेच अशा कोणत्याही बाबी विभागांकडे प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता सर्व विभागीय सचिवांनी घ्यावी. तसेच, विभागाकडील अधिवेशनाशी संबंधित कामकाजाचा आढावा दर आठवड्याला सचिवांनी घ्यावा.

४. सन्माननीय सदस्यांकडून विविध संसदीय आयुधांद्वारे उपस्थित करण्यात आलेल्या बाबींची उत्तरे परिपूर्ण आणि सर्वसमावेशक असतील तसेच, सदर उत्तरे विहित मुदतीत विधानमंडळ सचिवालयास / संबंधित सन्माननीय सदस्यांना पाठविली जातील आणि आश्वासनपूर्ती अहवाल विहित मुदतीत सादर केले जातील याचीही व्यक्तीशः दक्षता घ्यावी.

५. विविध संसदीय आयुधांद्वारे उपस्थित करण्यात आलेली आणि वरीलप्रमाणे कालमर्यादा आखून दिलेली कोणतीही बाब सदर कालमर्यादेपलीकडे प्रलंबित राहिल्यास, संबंधित विभागाच्या सचिवांविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे अनुपालन करून विधानमंडळाच्या अधिवेशनाचे कामकाज जबाबदारीने व सर्वप्राथम्याने हाताळावे.

प्रस्तुत शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०६१७१७०२०८०५१५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAJESH AGGARWAL
Date: 2026.06.19 16:26:55 +05'30'

(राजेश अग्रवाल)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
२) मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

३) मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व क्रीडा व युवक कल्याण) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई, सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) मा.मुख्य सचिव यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
७) सह सचिव/उप सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग (विधानमंडळ कामकाज समन्वय शाखा), मंत्रालय, मुंबई,
८) सर्व कक्ष अधिकारी, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) निवड नस्ती.